# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/१० दिनांक: २६ ऑक्टोंबर २०१७

## अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक २०१७ ची सूचना

**(NOTICE OF ELECTION)**

मतदार याद्या तयार करण्यासाठीचा कार्यक्रम घोषित करणारी विद्यापीठ अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/६, दिनांक: २८ ऑगस्ट २०१७ ला जोडून या अधिसूचनेद्वारा सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण), २८(२)(त), २८(२)(द), २८(२)(ध) व ३२(३)(छ), ४०(२)(ग), उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल, २०१७ ची प्राधिकरणांचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहित करणारी अधिसूचना आणि महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ व विद्यापीठ निदेश क्रमांक:२०–सी/२०१७,२०–डी/२०१७,२०–ई/२०१७,२०–एफ/२०१७,२०–एच/२०१७ व२०–आय/२०१७ नुसार विविध गटातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या **अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळांवर** सदस्य निवडून देण्याकरिता पुढीलप्रमाणे **निवडणूक वेळापत्रक भाग–२** विद्यापीठ निदेश क्रमांक २०–ए/२०१७ नुसार मा. कुलगुरूंचे मान्यतेने घोषित करण्यात येत आहे.

## निवडणूक वेळापत्रक भाग – २

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | क) खालील गटातून विद्यापीठाच्या अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळांवर सदस्य निवडून देण्याकरिता विद्यापीठ **निदेश क्रमांक २०–बी/२०१७ नुसार** नामनिर्देशन शुल्क रू. २०/– रकमेचा **"वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर"** हयांचे नावे निर्गमित केलेला राष्ट्रीयिकृत बॅंकेचा धनाकर्ष (DD) किंवा विद्यापीठाच्या रोख पटलावर रू.२०/– रोख जमा करून घेतलेली पावती जोडून **नामनिर्देशन पत्र** (Nomination paper) **कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी,** निवडणूक कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, महाराजबाग चौक, नागपूर – ४४०००१ यांचकडे उमेदवारीकरिता सादर करणे.<br><br>(१) प्राचार्य (Principal):<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) (Section 28(2)(o)) व विद्यापीठ निदेश क्रमांक:२०–सी/२०१७ नुसार प्राचार्य गटाने **अधिसभेवर** त्यांच्या मधून संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे **दहा प्राचार्य** पुढीलप्रमाणे निवडून द्यावयाचे आहेत. | |

| खुला प्रवर्ग | अनुसूचित जाती प्रवर्ग | अनुसूचित जमाती प्रवर्ग | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ५ | १ | १ | १ |

| इतर मागासवर्ग प्रवर्ग | महिला प्रवर्ग | एकूण |
|---|---|---|
| १ | १ | १० |

(कृ.मा.पहावे)